महानिर्मिती, औष्णिक विद्युत केंद्र, पारस

जाहीर सूचना

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महानिर्मिती पारस औष्णिक विद्युत केंद्र, पारस, ता. बाळापूर, जि. अकोला ४४४१०९ या आस्थापनेवर २०२५-२६ या सत्राकरीता आय. टी. आय. शिकाऊ उमेदवारी अंतर्गत अर्हता धारक खालील ट्रेड च्या जागा भरावयाच्या आहे.

अ.क्र.	व्यवसायाचे नाव	भरावयाच्या जागा	अ.क्र.	व्यवसायाचे नाव	भरावयाच्या जागा
१)	टर्नर (कातारी)	०८	६)	वेल्डर (संधाता)	३०
२)	मशिनिस्ट (यांत्रिकी)	०७	७)	कोपा	१०
३)	इलेक्ट्रीशियन (विजतंत्री)	२५	८)	मेकॅनिक डिझेल	१५
४)	वायरमन (तारतंत्री)	१०	९)	प्लंबर (नळ कारागीर)	०५
५)	फिटर (जोडारी)	३०		एकूण भरावयाच्या जागा	१४०

इच्छुक आय. टी. आय. उत्तीर्ण शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणासाठी उमेदवाराने अंतीम दि.०९.०५.२०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी तसेच Profile 100% अद्यावत करून संकेतस्थळावरील आस्थापना कोड क्र.E10162700695 M. S. P. G. C. L. Paras Thermal Power Station पर्याय निवडुन Online Apply करणे आवश्यक आहे. सदर इच्छुक उमेदवाराने औद्योगीक प्रशिक्षण संस्था मधुन (ITI) व्यवसाय परिक्षेत मागासवर्गीय उत्तीर्ण उमेदवारास (अनु. जाती/अनु.जमाती.) कमीत कमी ५५% गुण व खुल्या प्रवर्गातील कमीत कमी ६०% गुण प्राप्त करुन उत्तीर्ण झालेले सत्र २०२१ पासुनचे उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहे. शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड करण्याकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यास तांत्रिक अडचणी येत असल्याचे नाकारता येत नाही. या कारणास्तव व शिकाऊ उमेदवाराची निवड प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण करण्याच्या उद्देशाने खालील प्रमाणे कागदपत्रे संबंधीत पात्र उमेदवारांनी सदरील संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच अधीक सुचना खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

कागदपत्रे : १) आय. टी. आय. एकत्रीत अंतिम सेमीस्टरची गुणपत्रीका (All Semester Marksheet)
२) इयत्ता १० ची गुणपत्रीका (S.S.C. Marksheet) ३) रहीवासी दाखला (Domicile Certificate)
४) आधार कार्ड ५) पासपोर्ट साईज फोटो

सुचना: १) स्थानिक उमेदवारांकरीता (महानिर्मिती प्रकल्प बाधीत गावातील) - स्थानिक प्रकल्पबाधीत गावे अंतर्गत पारस, कोळासा, मनारखेड, मांडोली, सातरगांव ई. गावे येत असुन त्याबाबतचा पुरावा म्हणुन इलेक्ट्रीक बील, राशन कार्ड, ग्रामपंचायत दाखला सादर करणे आवश्यक राहील व महानिर्मिती कंपनीतील प्रकल्पग्रस्त उमेदवाराकरीता प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र आवश्यक राहील तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांचे पाल्य यांच्याकरीता कार्यरत कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र आवश्यक राहील.

टिप: केवळ स्थानीक उमेदवार (महानिर्मिती प्रकल्प बाधीत गावतील) / महानिर्मिती प्रकल्पग्रस्त उमेदवार आणि महानिर्मिती कार्यरत कर्मचाऱ्यांचे पाल्य यांनी दि.०९.०५.२०२५ पर्यंत सदरील संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या अर्जासह अपलोड केलेले शैक्षणीक दस्तऐवज व स्थानीक उमेदवार (महानिर्मिती प्रकल्प बाधीत गावतील) / महानिर्मिती प्रकल्पग्रस्त उमेदवार आणि महानिर्मिती कार्यरत कर्मचाऱ्यांचे पाल्य या बाबतचे (सुचना क्र. १ प्रमाणे) संबंधीत नमुद कागदपत्रे औ.वि. केंद्र, पारस, मानव संसाधन विभागामध्ये आवक येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सादर करावे तद्नंतर विहीत कालावधीत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. अन्य कुठल्याही उमेदवारांचे अर्ज स्वीकारल्या जाणार नाही याची विषेश नोंद घ्यावी.

२) निवड प्रक्रिया - सर्वसाधरण उमेदवार व स्थानिक उमेदवार (महानिर्मिती प्रकल्प बाधीत गावतील) / महानिर्मिती प्रकल्पग्रस्त उमेदवार आणि महानिर्मिती कार्यरत कर्मचाऱ्यांचे पाल्य यांच्या आय. टी. आय. एकत्रीत अंतिम सेमीस्टरची गुणपत्रीका (All Semester Marksheet) गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

३) वयोमर्यादा - दि. ०९.०५.२०२५ रोजी उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच मागासवर्गीय उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ०५ वर्ष शिथील केली आहे.

४) शासन निर्णयानुसार अनुसुचीत जाती आणी अनुसुचीत जमाती तसेच महिलांकरीता व दिव्यांग आरक्षणानुसार पदे राखीव राहतील.

५) नमुद तारखेनंतर येणारे ऑनलाईन फॉर्म किंवा वेळेच्याआत ऑनलाईन पध्दतीने भरलेला अपुर्ण किंवा आवश्यक दस्तऐवज न जोडलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

६) नमुद संकेतस्थळाव्यतीरिक्त इतर कुठल्याही माध्यमातुन केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही यांची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

७) निवड यादीत नाव समावेश करण्याकरीता प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या कुठल्याही राजकीय / अराजकीय किंवा कुठल्याही अन्य माध्यमातुन प्रशासनावर दबाव आणल्यास सदर उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

८) महानिर्मिती कंपनीच्या नियमास अधिन राहून सदर ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांची मेरिटनुसार गुणवत्तेनुसार तात्पुर्ती निवड यादी / प्रतिक्षा यादी व अंतिम यादी ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवाराच्या वैयक्तीक ईमेलवरच पाठविण्यात येईल.

९) प्रसारीत करण्यात आलेल्या आय. टी. आय. उमेदवारांच्या तात्पुरत्या निवड यादीवर काही अडचण / समस्या किंवा आक्षेप नोंदवयाचे असल्यास संबंधीतांनी वैयक्तीक ईमेलवर प्राप्त यादी प्रसारीत झाल्याच्या ०७ दिवसाच्या आत या कार्यालयास योग्य त्या पुराव्यासह लेखी अर्ज सादर करावे दिलेल्या मुदतीनंतर किंवा पोस्ट सेवेने आक्षेप अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास त्याबाबत दखल घेण्यात येणार नाही.

१०) सदर शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणार्थ्यांचे निवडीचे निकष तसेच भरती प्रक्रिया पुर्णतः व अंशतः कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार तसेच टंकलेखनातील अनावधाने राहीलेल्या चुका / तृटी दुरुस्तीचे अधिकार महानिर्मिती, औ. वि. केंद्र, पारस प्रशासन राखुन ठेवत आहे.

मुख्य अभियंता
महानिर्मिती, औ. वि. केंद्र, पारस